473

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. विमंअ-२०२४/ प्र.क्र.१४५/ २४/मंआस्था-२, दि.११/१२/२०२४.

**विषय** :- महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२४ हे हिवाळी अधिवेशनासाठी मंत्रालयीन विभागाचे टपाल नागपूर येथे पाठविणे आणि मुंबई येथे प्राप्त झालेले टपाल स्विकारणे यांची व्यवस्था.

******

**परिपत्रक** -

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. विमंअ-२०२४/ प्र.क्र.१४५/२४/ मंआस्था-२, दि. ११/१२/२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१११३४९२५९२०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र विधानंडळाचे सन २०२४ हे हिवाळी अधिवेशनासाठी मंत्रालयीन विभागाचे टपाल नागपूर येथे पाठविणे आणि मुंबई येथे प्राप्त झालेले टपाल स्विकारणे यांची व्यवस्था**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक क्रमांक : विमंअ-२०२४/ प्र.क्र.१४५/२४/ मंआस्था-२,**
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२४

**शासन परिपत्रक :**

समक्रमांकाचे दिनांक ०९ डिसेंबर, २०२४ चे परिपत्रक ऑफलाईन निर्गमित करण्यात आले आहे. तरी सदर परिपत्रक आज रोजी शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२४ चे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून सुरु होत आहे. विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांचे टपाल नागपूर येथे पाठविणे आणि नागपूर येथून प्राप्त झालेले टपाल मंत्रालयीन विभागांना वाटप करणे, हे कामकाज सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन - मंआस्था-२ मार्फत करण्यात येते. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

३. **टपाल स्वीकारणे :-**

नागपूर येथे टपाल पाठविण्याची व्यवस्था दिनांक १२ डिसेंबर, २०२४ पासून कार्यान्वित होईल. सदर टपाल कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी १२१०५/ १२२८९ डाऊन, मुंबई – नागपूर विदर्भ/ दुरांतो एक्सप्रेसने नागपूर येथे पाठविण्यात येईल. सदर दैनंदिन कामकाज सुरक्षितपणे आणि विहित कालमर्यादेत पूर्ण व्हावे, याकरिता सर्व मंत्रालयीन विभाग यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे टपाल कॅनव्हास बॅगेत मोहोरबंद करुन सामान्य प्रशासन विभाग, मंआस्था-२, त्रिमूर्ती प्रांगण, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे दिनांक १२ डिसेंबर, २०२४ पासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ११.३० ते ०२.०० या वेळेत पोहोचेल, अशा रीतीने पाठवावे. तसेच मा. मुख्यमंत्री/ उपमुख्यमंत्री व सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांचे कार्यालयीन अभिलेख व साधन सामुग्री नागपूर येथे पाठविण्यासाठी तथा सर्व मंत्री/ राज्यमंत्री महोदयांच्या नागपूर शिबिर कार्यालयातील अभिलेख व साधन सामुग्री मंत्रालय, मुंबई येथे वाहून आणण्यासाठी एस.टी.महामंडळाचे चार (४) ट्रक्स नैमित्तीक करार पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

४. **नागपूर येथे टपाल पाठवितांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी** :-

(३.१) कॅनव्हास बॅग फक्त कार्यालयीन टपाल पाठविण्यासाठीच वापरावी. इतर खाजगी वस्तू, भेटवस्तू कुठल्याही प्रकारचे वैयक्तिक सामान आढळून आल्यास सदरचे सामान या कार्यासनाच्या भांडार शाखेमार्फत जप्त करण्यात येईल.

(३.१) दुसऱ्या विभागाचे टपाल आपल्या विभागाच्या बॅगेतून पाठवू नये.

(३.३) ज्यामुळे टपालातील कागदपत्र खराब होतील, अशा शाईच्या बाटल्या, रोनिओ शाईच्या ट्युब्ज आणि अशा प्रकारच्या इतर वस्तू, या बॅगांमध्ये ठेवू नयेत.

(३.४) छापील अहवालांच्या प्रती या टपालातून पाठविल्या जाणार नाहीत.

(३.५) कॅनव्हास बॅगा टपालाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी वापरल्या गेल्या आहेत, असे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

५. **टपाल कालमर्यादेत पाठविण्याची आवश्यकता :-**

सर्व मंत्रालयीन विभागाकडून नागपूर येथे पाठविण्याकरिता सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झालेल्या टपालाचे गठ्ठे हे विभागनिहाय तयार करुन मोहोरबंद केले जातात. सदर गठ्ठे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुख्य), मुंबई रेल्वे स्टेशनवर नेऊन त्यांचे वजन करणे, नोंदी करणे, विभागनिहाय गठ्ठे रेल्वे गाडीत चढविणे व इतर अनुषंगिक कामे टपाल नागपूर येथे विहित कालमर्यादेत पोहोचविणे शक्य व सुलभ होण्याकरिता, मध्य रेल्वेने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि विहीत कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सदर कामकाज सुरक्षितपणे व अचूकपणे पूर्ण करण्याकरिता मध्य रेल्वेने उपलब्ध केलेल्या कालमर्यादेचे बंधन काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. यास्तव विहित कालमर्यादेपेक्षा उशिरा प्राप्त झालेले टपाल या विभागात स्वीकारले जाणार नाहीत. उशीरा/ विलंबाने प्राप्त होणारे टपाल नागपूर येथे पोहोचवण्यासाठी संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाची असेल.

६. **नागपूर येथून् टपाल पाठविणे आणि टपाल वाटप व्यवस्था :-**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुख्य), मुंबई येथून डाऊन १२१०५/ १२२८९ मुंबई - नागपूर विदर्भ/ दुरांतो एक्सप्रेसने पाठविलेले टपाल नागपूर येथे ताब्यात घेण्याची व तद्नंतर सदर टपाल नागपूर शिबीर कार्यालयातील संबंधित विभाग यांना वाटप करण्याची व्यवस्था विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयामार्फत करण्यात यावी. यास्तव नागपूर अधिवेशन कालावधीत तेथे स्थलांतरित होणाऱ्या सर्व विभाग/ शिबीर कार्यालयांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे मंत्रालय, मुंबई येथे पाठवावयाचे सर्व टपाल कॅन्व्हास बॅगेत मोहोरबंद करुन विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार आणि विहित कालमर्यादेत त्यांच्याकडे सुपूर्द करावे. याबाबतचे निर्देश विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयातून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

७. **नागपूर येथून प्राप्त टपाल वाटपाची व्यवस्था :-**

नागपूर येथून आलेले टपाल सामान्य प्रशासन विभाग, मंआस्था-२, त्रिमूर्ती प्रांगण, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे ठेवण्यात येईल. मंत्रालयीन विभागांनी त्यांचे संबंधित टपाल तेथून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत पोच देऊन ताब्यात घ्यावे.

८. मुंबई ते नागपूर व नागपूर ते मुंबई अशा प्रकारे टपाल पाठविण्याच्या कार्यपध्दतीत काही बदल झाल्यास, त्याचप्रमाणे प्रसंगनिहाय कळविण्यात येईल.

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२१११३४९२५९२०७ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=0990ae5e49835c85a735703503a82e3cd3cdde019c8ce2fdb9c7765ef1b7c39f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2024.12.11 13:52:22 +05'30'

**( दे.सां.भगुरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, वाळकेश्वर रोड, मुंबई-३५ (पत्रान्वये)
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
४. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

५. मुख्य सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
६. संपर्क अधिकारी, राज्य विधानमंडळ, नागपूर (पत्रान्वये)
७. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर (पत्रान्वये)
८. जिल्हाधिकारी, नागपूर (पत्रान्वये)
९. सर्व मंत्रालयीन विभाग, नोंदणी शाखा, मंत्रालय, मूंबई-३२
१०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मूंबई-३२
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
१२. निवडनस्ती – मंआस्था-२